# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणाऱ्या कविता

**डॉ. वैशाली श्रीकांत गुंजेकर** भोगावती महाविद्यालय, कुरुकली

---

**प्रास्ताविक**

साहित्य हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. म्हणूनच १९५२ सालच्या भाषणात ते म्हणाले, ' मला इंजिनियर हवेत, मला डॉक्टर हवेत, वकील हवेत आणि सर्वात जास्त निकड मला साहित्यिकांची आहे.' नवसमाज निर्मितीसाठी सर्वात जास्त साहित्यिकांची गरज असल्याचे मत बाबासाहेबांनी मांडले. यावरूनच साहित्यिकांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. साहित्यातून उदात्त जीवनमूल्य आणि सांस्कृतिक मूल्य अविष्कृत झाली पाहिजेत. आपल्या देशातील उपेक्षितांचे, दलितांचे, दुःखितांचे खूप मोठे जग आहे. त्यांच्या दुःखाच्या वेदना नीट समजावून घ्यायला पाहिजेत. खेड्यापाड्यातील अंधार दूर होईल आणि दुःखितांचे जीवन उन्नत होईल असे मानवतावादी साहित्य निर्माण केले पाहिजे. हा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नवशिक्षित साहित्यिकांमध्ये रुजविला. आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा अनेक साहित्यिकांनी घेतली. प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करून समाजात नव्या मूल्यांची रुजवणूक कथा, कादंबरी, नाटक, कविता, आत्मकथन, वैचारिक लेख, यासारख्या अनेक साहित्यकृती अविष्कृत होऊ लागली. वेदना, विद्रोह ,नकार, मानवतावाद आणि विज्ञाननिष्ठता या आंबेडकरांच्या विचारांचे दर्शन साहित्यातून घडू लागले.

दलित साहित्याच्या निर्मितीचे प्रेरणास्रोत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वप्रथम 'दलित' या शब्दाचा वापर केला आहे. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वातील अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांना ललित कलांविषयी अभिरुची होती. तसेच त्यांनी चळवळीच्या कामकाजाबरोबर 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' इत्यादी पत्रातून विपुल असे वैचारिक व ललित लेखन केले आहे. मराठी साहित्याचे विषय हे उच्चवर्णीय आहेत. परंतु समाजातील तळागाळातील बहुजन समाजाचे वास्तव मांडणारे साहित्य समाजात अविष्कृत झालेले नाही. त्याचा ऊहापोह करणे अत्यंत आवश्यक आहे. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यातून समाजातील विविध प्रवाहंचे दर्शन घडविले जाते. परंतु मराठी साहित्यात केवळ सदाशिवपेटी लोकांच्या जीवनाचा वेध घेतला जात होता. त्यामुळे या मराठी साहित्याला डॉ. आंबेडकर 'बामणी वाङ्मय' असे संबोधतात. जीवनात दररोज नवा संघर्ष झेलून जगत असलेल्या माणसांची भूमिका साहित्याचे विषय झाले पाहिजेत. हा मूलगामी विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या कार्यकर्तृत्वातून सातत्याने मांडतात. तसेच सबंध दलित समाज जागृत करण्याचे महान कार्य करतात. दलित समाजातील नवशिक्षित तरुण-तरुणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या कार्याने भारावून गेले आणि लिहिण्यास प्रवृत्त झाले आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि विचारांचे दर्शन 'कविता' या साहित्यकृतीच्या आधारे मांडणार आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध कवितेच्या माध्यमातून घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दलित समाजविषयकतेची भूमिका स्पष्ट करणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा अभ्यास करणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दलित कवी आणि कवयत्रींवर पडलेला प्रभाव जाणून घेणे.

१९५६ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन झाले आणि भारतातील शोषित समाज शोक सागरात बुडाला. शोषितांचे, दलितांचे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ. आंबेडकरांच्या निधनाचा धक्का तीव्र होता. त्यामुळेच त्यांच्या संबंधी लिहिले पाहिजे, त्यांच्या आठवणी जागवल्या पाहिजेत, त्यांच्या विचारांची जागृती रोमारोमात भिनवून नव्या संघर्षाला सामोरे गेले पाहिजे असे दलित कार्यकर्त्यांना, विचारवंतांना आणि संवेदनशील कवींना वाटू लागले. ज्या प्रेरणेतूनच दलित साहित्य उदयाला आले, त्या दलित साहित्यिकांना आणि विशेषत: कवींना आंबेडकरांबद्दल काहीतरी लिहिले पाहिजे याची जाणीव होऊ लागली. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी विपुल कविता लिहिल्या गेल्या आहेत.

१९६० नंतर दलित साहित्याच्या चळवळीला प्रारंभ झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दुःखद निधनाचे वास्तव स्वीकारून त्यांचे विचारधन प्रकाशात आणण्यासाठी लेखन केले पाहिजे ही जाणीव दलित साहित्यिकांना झाली. समाजातील विषमतेविरोधी निषेध या कालखंडातील साहित्यिकांनी जोमाने केला. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक अन्याय अत्याचाराविषयकतेची चित्रणे अधिक गडदपणे दिसू लागली. अन्याया विरोधात बंडखोरीची, विद्रोहाची जाणीव उफाळून येऊ लागली. ती अगोदरच्या साहित्यात दिसून येत नव्हती. तसेच या बंडखोरी आणि विद्रोहाबरोबर समाजात नव्या मूल्यांची उभारणी केली तरच विद्रोहाच्या जाणिवेला अर्थ प्राप्त होऊ शकतो. कवींच्या या वैचारिक पार्श्वभूमी संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "जीवनाची, समाजाची नव्याने मांडणी करण्यासाठी मानवता, विज्ञाननिष्ठा, लोकशाही, समता, राष्ट्रीय एकात्मता इ मूल्यांचा

ध्यासही मराठी कवितेने याच कालखंडात घेतला आहे. जीवनाच्या परिवर्तनाचे स्वप्न पाहिले आहे. हे सगळे कसे घडले याचे स्पष्ट उत्तर म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधनाचाच एक प्रभाव आहे.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेले दलित कवी जीवनाचा शोध एका वेगळ्याच दृष्टीने घेताना आणि नव्या जीवनाची स्वप्ने पाहतात दिसतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा, कार्याचा प्रभाव दलित साहित्यावर होता. म्हणून दलित वाङ्मयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दर्शन सातत्याने होत राहते. विशेषतः डॉ आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाला कवितेतून साकार करण्याचा प्रयत्न अनेक कवींनी केला आहे. तसेच काही कवींनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी संवाद साधला आहे. डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन हे भक्ती भावनेच्या पातळीवर अविष्कृत झालेले दिसते, तर काही ठिकाणी त्यांच्या व्यक्तिमत्वातील अनेक पैलू कवितेतून साकार केले आहेत.

वामन कर्डक (वाटचाल), नामदेव ढसाळ (गोलपिठा), ज.वि. पवार (नाकेबंदी), यशवंत मनोहर (उत्थानगुंफा), ज्योती लांजेवार (दिशा), रामा दातोंडे (रापी जेव्हा लेखणी बनते), रविचंद्र हडसरकर (देणगी),केशव मेश्राम (उलगुलान), शरणकुमार लिंबाळे (उत्पात), भगवान देसाई (चैत्यगवाक्ष), माधव कांबळे (सीमोल्लंघन), यासारख्या अनेक दलित कवींनी काव्यसंग्रहातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिकवणूकीचा, मूल्यांचा, विचारांचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक अंगांचा आशय अभिव्यक्त केलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण आयुष्य दलित शोषित माणसाच्या उद्धारासाठी लढले. ज्यांनी आपल्यावर अन्याय केला, अत्याचार केला, संस्कृतीच्या नावाखाली बारा महिने अठराविश्व दारिद्र्यात सडत ठेवले. त्या अन्यायग्रस्त समाजाला जागृत करण्याचे काम आंबेडकरांनी केले. त्यांच्या कार्याचा प्रभाव साहित्यिकांवर पडला. त्यामुळेच त्यांच्या साहित्यकृतीतून बाबासाहेबांच्या कार्याचा, विचारांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम दिसू लागला. दलित वाङ्मयातील एक नवी जाणीव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. दलित साहित्य चळवळीतील बहुसंख्य साहित्यिकांना आंबेडकरांची विचारधारा रुजविणे महत्त्वाचे वाटत होते. म्हणूनच कलाकृतीतून बंडाची भाषा व्यक्त होऊ लागली. या बंडखोरी भाषेचे आणि बाबासाहेबांच्या विचारांचे दर्शन कविता या साहित्य कृतीतून मोठ्या प्रमाणात अधोरेखित होऊ लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व साकारणारे आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाशी आपले नाते काव्यात्मकपणे स्पष्ट करणारे नामदेव ढसाळ हे दलित साहित्य चळवळीतील एक अग्रेसर कवी आहेत. त्यांच्या 'गोलपिठा' या काव्यसंग्रहातील 'डॉ. आंबेडकर' या कवितेत ते बाबासाहेबांना अनेक विशेषणे लावतात. त्यांनी केलेल्या कार्याची, मांडलेल्या विचारांची तुलना कोणाबरोबर होऊ शकत नाही असा दृढ विश्वास कवितेतून मांडतात. उत्तुंग व्यक्तिमत्व असलेल्या बाबासाहेबांविषयी ते लिहितात, जनशक्तीला जाग आणणारा, त्यांच्यात नवीन जाणीव व प्राण भरणार नेता, पुढारी नायक म्हणजे बाबासाहेब आंबेडकर. जय जयकारांच्या नद्यातून वाहणारा, रयतेची चाकरी नि येसकराची भाकरी नाकारणारा, जनशक्तीच्या किमयेला जाग आणणारा, केकीच्या आणि रमच्या चिखलात न रुजणारा, पाय पुसण्यावर न बसणारा, फुलपाखरासारखा उडणारा, प्रकाश पसरवणारा, रुळांबरोबर वाढत जाणारा, युनिव्हर्सिटीचे चिरेबंद ढिले करणारा, स्वातंत्र्याकडून स्वातंत्र्याकडे जाणारा, अशा महामानवाला नामदेव ढसाळ म्हणतात,

"असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी
जो दिग्विजयी तंद्रेतून आमच्यात उतरतो
नि शेतातून गर्दीतून नि मोर्चातून नि लढ्यातून
आमच्याबरोबर असतो.
नि आम्हाला शोषणातून सोडवतो
तो तू
तोच तू आमचा" ( गोलपिठा – डॉ. आंबेडकर पृष्ठ ६५)

नामदेव ढसाळ आमच्याच रथाचा सारथी म्हणून बाबासाहेबांचा गौरव करून त्यांचे नायकत्व मांडतात. एकुलता एक म्हणजे दुसरा कोणीही नाही असा भाव व्यक्त करतात. यातून लाडका असाही एक अर्थ अभिप्रेत होतो. बाबासाहेबांच्या बद्दल वापरलेल्या शब्दातून एक जवळीकतेचे नाते नामदेव ढसाळ प्रस्थापित करताना दिसतात.

त्र्यंबक सपकाळे यांच्या 'सुरुंग' या काव्यसंग्रहातील 'पाईक' या कवितेतून युगानयुगाचा अंध:कार दूर करून प्रकाशाची, आत्मतेजाची वाट दाखविणारे छातीचा कोट करून पोलादी मनगटांना संकटे झेलण्यास शिकविणारे आणि माणसांच्या मांगल्याचे नवतेज दाखविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकट झाले आहेत. ते समाजाला नवी मूल्य देत आहेत आणि त्यांच्यामुळे आपल्याला भगवंताच्या प्रज्ञेचा, करुणेचा स्पर्श झाल्याची जाणीव त्र्यंबक सपकाळे यांना महत्त्वाची वाटत आहे. काहीही उध्वस्त करताना आपल्याला नवे भान येत असल्याचे कवितेत नोंदवताना म्हणतात,

"…. राजमहाल प्रसाद

तुडविले असते एका क्षणात
परंतु आता ते
सर्व वर्ज आहे
मी पाईक झालो ना
भगवंताच्या तत्त्वज्ञानाचा
प्रज्ञा, करूणेचा" (सुरुंग - पाईक पृ. ३६)

त्र्यंबक सपकाळे यांनी कवितेतून बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे एक नवे परिमाण व्यक्त केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे मानवतावादी विचार पेरले आहेत त्यातून आयुष्याला नवजीवन प्राप्त झाले आहे. या नवसृष्टीचा परिणाम आपल्या आचार विचारांवर झाल्याचा आशावाद त्र्यंबक सपकाळे व्यक्त करतात.

लोककवी म्हणून संबोधले जाणारे वामन कर्डक यांच्या कवितेतून प्रामुख्याने लोकशिक्षणाचा आशय चित्रित झालेला आहे. आपण ज्या समाजासाठी लिहीत आहोत त्या समाजाची भाषा, त्या समाजाचे लोकसंगीत काव्यलेखनात आले पाहिजे याची जाणीव त्यांना आहे. त्याचबरोबर या दलित, शोषित समाजाला नेमके काय द्यायला पाहिजे याचे भान आहे. त्यामुळे वामन कर्डक यांच्या कवितेची लोकप्रियता अधिक आहे. त्यांच्या पहाडी आवाजामुळे हजारोंचा समुदाय कविता ऐकताना दिसतो. ही लोकप्रियता केवळ त्यांच्या आवाजाची नाही तर कवितेतील आशयाची ही आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयीच्या अनेक कविता वामन कर्डक यांनी लिहिल्या आहेत. त्यांची शिकवण, त्यांचे गुणगान, त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या महापरिनिर्वाणानंतरची दलित समाजाची अवस्था या साऱ्या गोष्टींविषयीचे चिंतन कवितेतून मांडतात. दलित आणि शोषित समाजाला जागृत करतात. आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणाऱ्याला काही कमी पडणार नाही असा विश्वास सुचकत्वाने मांडतात.

"तुवा पेरले ते, तरारून आले
उभे शेत हिरवे नवे रूप ल्याले
तुझी आण भाकू, खडे आज ठाकू
तुझे रान राखू आणि सुख चाखू
सुखाचाच ठेवा, मिळाला महान
तुझ्या लेकरांना" ( वाटचाल - तुझे राण भीमा पृ. ४)

शेतीची प्रतिमा वापरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा परिणाम समाजमनावर रुजत आहे. त्यातून समाजपरिवर्तन होऊ लागले आहे. लोकशाहीभिमुख जीवन पद्धतीवर दलित विचारवंतांचा, कवींचा विश्वास दृढ होत असल्याचे दिसत आहे. हा बदल केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पेरलेल्या विचारधारेचा आहे.

रूढी परंपरांमध्ये आयुष्यभर गुलामीचे जीवन जगत असलेल्या समाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखी व्यक्ती जन्माला येते आणि या गुलामगिरी समाजव्यवस्थेविरोधी बंडखोरी करते. ही घटनाच विचारांच्या पलीकडची आहे. या विचाराचा अन्वयार्थ लावणे अवघड आहे आणि म्हणूनच वामन कर्डक यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनेक रूपात दिसतात. ते कधी आईच्या रूपात, तर कधी योद्धाच्या रूपात दिसतात. त्यांच्या व्यक्तिमत्वातील अनेकविध रूप पाहण्यात धन्यता मानतात. वामन कर्डक त्यांच्यावर पाळणाही लिहितात. 'भीम जन्माची कथा', 'सोन्याची सकाळ', 'चकित झाले वरती अंबर' यासारख्या कवितांमधून वामन कर्डक भीम जन्माची कथा मांडतात. भीम जन्मामुळे अख्खी सृष्टी मोहून गेली असल्याचा भाव व्यक्त करतात. 'माय भीमाईला पाहिले' या कवितेतून आईची प्रतिमा डॉ. आंबेडकरांमध्ये पाहताना ते म्हणतात,

"आम्ही माय भीमाईला पाहिले
फूल चरणी त्या जाऊन वाहिले
.... .... .... ....
क्रूर काळाच्या दुनियेत वामन
कोटी बाळाचे करताना पालन
माय माझी झिजली रे कणकण
आम्हासाठी हे सारे जिने साहिले. फुल चरणी"
(वाटचाल - माय भीमाईला पाहिले पृ. ६)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार व्यक्तिमत्त्वातले अनेक परिमाण या कवितेतून व्यक्त झाले आहेत. रूढी, प्रथा, परंपरांना झुगारून नवी शिकवण आणि लढाऊ बाणा रुजविणारे, नव्या धर्माची दीक्षा देणारे, आपल्या दलित जनतेवर प्रेम

करणारे आणि यासाठी सतत संघर्ष करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व साकार करण्याचा प्रयत्न वामन कर्डक कवितेतून करतात. गौतम बुद्ध नंतरचे बुद्ध डॉ. आंबेडकर आहेत आणि त्यामुळेच आपला सगळ्या जगात भीम किर्तीचा डंका वाजत आहे. आपल्या भारताचे वाली असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे आपल्या जीवनाचा विसावा आहे आणि त्यामुळेच 'मने मारून जिणे जगू नका श्वानाचे l मानी मर्द गडी तुम्ही भीमराणाचे ll' असे कवितेच्या माध्यमातून सांगू पाहतात.

डॉ. आंबेडकर यांच्या महानिर्वाणीचा काळ हा आकाशाची कुराड कोसळण्यासारखा होता. या अस्वस्थ काळातील विकल मनस्थिती प्रकट करताना म्हणतात,

"आज उदास उदास वाटे, माझी भीमाई दिसेना कुठे
..... ...... .... .....
दुपारी सहा डिसेंबर छप्पनला l तुझ्या निर्वाणीचा अग्नी पाहिला.
विजेच्या वेगाने कानी पडला l तुझा परिवार त्याने तडफडला .
पुरा घायाळ होऊन फडफडला l टाहो फोडून तुझ्यासाठी रडला.
पूर नेत्राच्या गंगेला चढला I देश शोकाच्या सागरी बुडला.
अचानक मृत्यू कैसा हा घडला l सिंह जाळ्यात कसा रे सापडला ll"

(वाटचाल - माझी भीमाई दिसेना पृ.१९)

असे अतिशय विकल उद्गार काढतात. डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूचे दुःख आकाशभर होऊन जाते. संपूर्ण आयुष्य समतेसाठी एकीच्या दोऱ्यात बांधलेला समाज त्यांच्या जाण्याने पोखरला जात असल्याचे पाहून वामन कर्डक व्यतीत होऊन लिहितात,

जाताच पिता अनुभवी, तापला दुहीचा रवी
संपली नवी टवटवी, बोले तो वामन कवी
आज मोजी घटका पळा, माझ्या भीमरायाचा मळा
(वाटचाल - माझ्या भीमरायाचा मळा पृ १२)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनामुळे वामन कर्डक यांचे व्यथित झालेले मन समाज दुहीमुळे अधिकच व्यथित होऊन जाते. आणि आंबेडकरांच्या आठवणीत धन्यता माननारे वामन कर्डक मातृत्वाचा प्रेमभाव व्यक्त करताना म्हणतात,

"काय सांगू तुला, आता भीमा माझा कसा होता
लेकराला जशी माता, भीमा माझा तसा होता"

(भीमा माझा कसा होता वाटचाल पृ.१५)

आंबेडकर चळवळीतील महत्त्वाचे कार्यकर्ते वामन कर्डक आहेत. त्यांनी आंबेडकरांना खूप जवळून अनुभवले आहे. म्हणूनच त्यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या आणि आंबेडकरांचे दर्शन घडविणाऱ्या कविता त्यांच्या इतक्या इतर कोणत्याही कवीने केलेल्या नाहीत.

दलित चळवळीतील ज. वि. पवार 'नाकेबंदी' या काव्यसंग्रहातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृती -उक्तीतून आपल्याला पेटण्याची शक्ती मिळत असल्याचा भाव व्यक्त करतात. आज पन्नास वर्षांनंतर ही त्यांच्या कार्यातून लढण्यासाठी नव्या दिशा दिसत आहेत पण, जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या प्रश्नासाठी क्रांतीचे रणशिंग फुंकले तेव्हा सर्वत्र काळोखाची स्थिती होती. त्या वस्तुस्थितीवर मात करून विजय मिळविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची उत्तुंगताना नोंदविताना ज.वि.पवार म्हणतात,

"तू फुंकलेस रणशिंग आघात ज्ञानाच्या बळावर
तू तोडल्यास गुलामांच्या पायातल्या बेड्या
आणि केलेच उभे चवदार तळ्याच्या काठावर युद्धात जवानांना
उभे करावे तसे.
.... ..... ....
आणि तू तू पेटवतोयस मला
आता समुद्राला आग आपणच लावली पाहिजे"

(नाकेबंदी - आज पन्नास वर्षांनी पृ. १९)

परंपरेने चालत आलेल्या धर्मव्यवस्थेला, वर्णव्यवस्थेला आणि अर्थव्यवस्थेला विरोध करण्यासाठी सर्वप्रथम गुलामगिरीच्या बेड्या तोडण्याचा क्रांतिकारक विचार दलितांमध्ये रुजविण्याचे काम डॉ. आंबेडकर यांनी केले आहे. शोषणाविरोधी लढण्याचे बळ देणाऱ्या आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील स्थायीभाव ज. वि. पवार प्रकट करतात.

ज्योती लांजेवार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'युगद्राष्टा' संबोधतात. डॉ आंबेडकरांनी ज्या नव्या समाजनिर्मितीची स्वप्ने पाहिली होती ती पूर्णपणे धुळीला मिळालेली पाहून ज्योती लांजेवार अस्वस्थ होतात. नवक्रांती घडवून आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची क्रांती घडविणे आवश्यक आहे. त्यातूनच विझलेल्या आशा प्रज्वलित होतील आणि नव समाजव्यवस्था निर्माण होईल. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रणाम करताना त्या म्हणतात,

"तुझ्या तेजातून निर्माण होणाऱ्या
उद्याच्या क्रांतीसुर्याला प्रणाम
प्रणाम माझा, हे थोर पुरुषा, प्रणाम" (दिशा - हे युगद्राष्ट्या पृ. ३)

'युगद्राष्ट्या' या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला समाज निर्माण करायचा असेल तर सर्वप्रथम त्यांच्या क्रांतीचा विचार प्रत्येकाच्या मनात कोरावा लागेल. परिवर्तनाच्या वाटेने चालणाऱ्या क्रांतीसूर्याला प्रणाम करू पाहणारी कवयत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील तेजस्वीपणा अधोरेखित करताना दिसते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही दलित समाज हा शोषितच राहिला. त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार थांबले नाहीत. हे पाहून यशवंत मनोहर अस्वस्थ होतात. आपले श्रद्धास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रश्न विचारतात, 'लक्तारलेली आयुष्य शिवणारा सुई दोरा तू कुठे ठेवलास ?' तसेच त्यांची आभाळाएवढी माया, सगळ्या मापदंडापेक्षाही मोठे असणारे चरण, सागराएवढे शहाणपण, त्यांची शक्ती, त्यांच्या चरणाचे युद्धतीर्थ, युगंधर या साऱ्या विशेषांचा प्रत्यय यशवंत मनोहर देतात आणि शेवटी प्रश्न करतात, 'अरे, या बेशरम अत्याचारांना फाडताना आम्ही विजयी होऊ असे विजयांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवले आहेस?' (उत्थानगुंफा - भीमराव रामजी आंबेडकर पृ. ७६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाला विजयांच्या शस्त्रसाठ्यांची प्रतिमा यशवंत मनोहर वापरुन आंबेडकरांचे व्यक्तिमत्व साकार करतात.

भुजंग मेश्राम हे चळवळीसाठी कविता लिहिणारे कवी आहेत. दलितांचे, शोषितांचे प्रेरणास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामर्थ्याची आठवण 'उलगुलान' या काव्यसंग्रहातील 'समुद्रपुत्र' या कवितेच्या माध्यमातून करून देतात.

"आभाळाची लाज राखताना तूच तर झाला होतास ना
क्षितिजांच्या खांद्यावर खेळणारा फिनिक्स
उघडी जखम घेऊन चालताना सनातन सावल्यांचे
चक्रवाही लपंडाव बघून गणांच्या रक्तपेशीतली
स्वप्नांची लिपी तूच तर कोरली होतीस
पहाडांच्या ओल्या छातीवर"

(उलगुलान - समुद्रपुत्र पृ ४३)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित चळवळीचे उदगाते आहेत. समाजातील पिचलेल्या दरिद्री समाजाला आत्मभान मिळवून देण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे. समाजपरिवर्तनासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा भुजंग मेश्राम 'समुद्रपुत्र' या कवितेतून करून देतात. तसेच डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वातील अथांगता उलगडून दाखवतात.

सर्वच दलित कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आदरभाव व्यक्त केला आहे. परंतु शरणकुमार लिंबाळे यांनी इतर दलित कवींपेक्षा वेगळा भाव कवितेतून मांडलेला दिसतो. 'उत्पात' या काव्यसंग्रहातील 'मी एक आंबेडकर' या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अनुयायांसमोर आपले मनोगत व्यक्त करत असल्याचे दिसतात. अनुयायी आपल्या वर्तमान जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा स्वार्थासाठी वापर करून घेत असल्याचा भाव शरणकुमार लिंबाळे मांडतात,

"मी एक सार्वजनिक आंबेडकर, बी.सी. कांबळयांचा पाव
खोब्रागड्याचा पाव, गवईगटाचा पाव
आधा पाव पँथरचा, आधा पाव मासमूहमेंटचा"
(उत्पात - मी एक आंबेडकर पृ.१८)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या राष्ट्र मजबुतीसाठी पक्ष हवा होता. परंतु त्यांच्या निर्वाणानंतर त्यांच्याच अनुयायांनी पक्षात फोडाफोडीचे राजकारण केले. प्रत्येकाने आपल्या मतलबासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वापर करून

घेतला. एवढेच नव्हे तर बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेसमोर उदबत्त्या आणि नारळ फोडून नवसही केले. त्यांना देवाचा अवतारच बनविले त्यामुळे शरणकुमार लिंबाळे अस्वस्थ होतात. कवितेच्या माध्यमातून म्हणतात,

"अरे स्वार्थी फकीरांनो,
तुमची छाती फाडा
अन् दिसतो का पहा मी?
तुम्हीच तुम्हाला आंबेडकर दिसाल" (उत्पात - मी एक आंबेडकर पृ १९)

आपल्या अनुयायांनाच आंबेडकर बनविण्याचे धाडस स्वतः आंबेडकर करत असल्याचा भाव शरणकुमार निंबाळे या कवितेतून व्यक्त करतात. असे मायावी व्यक्तिमत्व कवितेच्या माध्यमातून साकारले आहे. तसेच आंबेडकर भगवान बुद्धाला सांगतात की, या स्वार्थी फकीरांना तुम्ही क्षमा करा. आपल्या अनुयायांवर प्रेम करणाऱ्या आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रेमभाव शरणकुमार लिंबाळे अत्यंत उत्कटपणे रेखाटतात.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम मराठी साहित्य क्षेत्रावर झालेला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंचा उलगडा दलित कवींनी केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा आचारांचा प्रभाव दलित विचारवंतांवर, साहित्यिकांवर पडलेला आहे. दलित शोषित समाजाला परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जायचे असेल तर, सर्वप्रथम त्यांना सक्षम बनविणे आवश्यक आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकृतीने प्रभावित झालेले कवी आणि कवयित्री सांगू पाहतात. प्रस्थापित समाज व्यवस्थेतील सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमतेविरुद्ध लढण्याची प्रेरणा आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वातून देतात. एकूणच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बहुआयामी दृष्टिकोनांचा शोध कवितेच्या माध्यमातून दलित कवी आणि कवयत्री सातत्याने घेताना दिसतात. प्रस्तुत अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे,

**निष्कर्ष**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाला कवितेत साकार करण्याचा प्रयत्न दलित कवींनी केलेला आहे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूल्यांचा, विचारांचा, शिकवणुकीचा आशय अभिव्यक्त केला आहे.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित वाङ्मयातील एक नवी जाणीव आहेत.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा रुजवण्याचे कार्य कवी-कवयत्री करत आहेत.
5. कवितेत वेगवेगळ्या प्रतिमा वापरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वातीलवि विधांगी पैलूंचा शोध घेतलेला आहे.
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वावर भाष्य केवळ दलित साहित्यिकच करताना दिसतात.

**संदर्भ ग्रंथ**

1. कोत्तापल्ले, नागनाथ – 'साहित्याचा अन्वयार्थ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे१९९६
2. डॉ. सोनकांबळे, के. जी. - 'मराठी दलित कविता : आशय आणि अभिव्यक्ती', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००७
3. फडके, भालचंद्र -'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७
4. त्र्यंबक, सपकाळे - 'सुरुंग' अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, १९७६
5. ढसाळ, नामदेव - 'गोलपिठा' लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००९
6. कर्डक, वामन - 'वाटचाल' निर्मल प्रकाशन, नांदेड,१९७३
7. मेश्राम, भुजंग - 'उलगुलान', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९५